निर्भिड आणि निरपेक्ष

# प्रभात संगम

■ संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ वर्ष : १३ ■ अंक : १८ ■ बुधवार, १४ जानेवारी २०२६ ■ पाने : ४ ■ किंमत : २ रुपये

# आम्ही विकासपुरुषाचे 'शिलेदार'

## सांगलीवाडीत नको सुडाचे राजकारण ; हवे सुसज्ज गाव करण्याचे समाजकारण



## प्रभाग क्रमांक १३ मधील

### भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार



श्री.महाबळेश्वर शंकर चौगुले
(अ) ओबीसी पुरुष



सौ.मिनल अजिंक्य पाटील
(ब) सर्वसाधारण महिला



सौ.अनुराधा महेश मोहिते
(क) सर्वसाधारण महिला



**सांगली : विशेष प्रतिनिधी**

महापालिका क्षेत्रात असूनही वेगळा वारसा जपणाऱ्या सांगलीवाडी अर्थात प्रभाग १४ च्या निवडणुकीची रणधुमाळी तापली आहे. यात भाजपकडून उतरलेले उमेदवार महाबळेश्वर चौगु-ले, मीनल अजिंक्य पाटील, अनुराधा महेश मोहिते या सांगलीवाडीचे भूषण विकाषपुरुष माजी आमदार दिनकरतात्या पाटील यांचे शिलेदार म्हणून मैदानात आहेत. जरी ही निवडणूक भाजप विरुद्ध महाविकास आघाडी अशी असली तरी त्यात सुडाचे राजकारण नको तर विकासासाठी तात्यांच्या मार्गर्शनाखाली भाजपचेच पॅनेल भरभरक्कम पर्याय असल्याची जनभावना आहे. त्यामुळे सांगलीवाडीत फिर एकबार भाजप रूपाने 'छत्रपती शासन' च असे चित्र स्पष्ट आहे.

ग्रामीण धाटीच्या सांगलीवाडीत दिनकरतात्यांच्या रूपाने अनेक वर्षे विकासगंगा वाहात आहे. नगर-सेवकपदावरून सुरुवात केलेल्या तात्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वावर आमदारकी पटकावत शहराच्या आणि जिल्ह्याच्या विकासाला हातभार लावला. रोखठोक आणि प्रसंगी विकासात कोणतीही तडजोड न करणाऱ्या दिनकरतात्यांना आतापर्यंत सांग़लीवाडीने साथ दिली आणि तात्यांनीही त्या संधीचे आतापर्यंत सोने केले आहे. सांगली विधानसभा मतदारसंघासह मिरज तालुक्यातील कृष्णा, वारणाकाठच्या क्षारपड जमिनी पुन्हा पिकाऊ करण्यासाठी तात्यांनी क्षारपड निर्मूलन पॅटर्न राबविला. त्यामुळे हजारो एकर जमिनी पुन्हा क्षारपडमुक्त झाल्या.

सिंचन, रस्ते विकास तसेच शहरातील गुंठेव-ारीमुक्तीसाठी गुंठे नियमितीकरणाचा केलेला कायदा हा राज्यभरात आदर्शवत ठरला आहे. यासह शेतकरी, कष्टकरी, उद्योग, व्यवसायाला त्यांच्या व्हिजनरी संकल्पनांनी गती मिळाली आहे. राजकारणापेक्षा विकासाचे समाजकारण हे तात्यांचे ब्रिद असल्याने ते अजातशत्रू आहेत. आज शहरासह जिल्ह्यात भाजपचा जो बोलबाला आहे त्यातही तात्यांचे मोठे योगदान आहे.

अशा तात्यांच्या समाजकारणाचे बाळकडू लाभलेल्या पुत्र अजिंक्य पाटील यांनीही तोच वारसा तात्यांच्या मार्गदर्शनाखाली जपला आहे. त्यातू-नच मिळालेल्या पहिल्या संधीतून नगरसेवक, स्थायी समिती सभापती म्हणून निव्वळ सांगलीवाडीच नव्हे तर विविध प्रकल्प, योजनांच्या माध्यमातून शहराच्या विकासाला चालना देण्याचे काम त्यांनी केले. त्या-चप्रमाणे मागील टर्ममध्ये सांगलीवाडीला महापालि-का क्षेत्रातील सर्वात सुसज्ज आणि सुविधांनीयुक्त असा प्रभाग अजिंक्य पाटील यांच्यासह टीमने केले. अजिंक्य पाटील यांच्या नेतृत्वाखाली मागच्या टर्ममध्ये तब्बल २२ कोटींचा निधी खेचून विकास काय असतो ते त्यांनी दाखवून दिले.

आता त्याच आधारे पुन्हा तात्यांच्या विकासाचे शिलेदार व अजिंक्य पाटील यांचे साथीदार म्हणून म्हणून आरक्षणानुसार महाबळेश्वर चौगुले, सौ. मीनल पाटील, सौ. अनुराधा मोहिते हे भाजपच्या माध्यमातून शिलेदार पुढे आले आहेत.

विकासाच्या मुद्द्यांवर भाजपचे हे तिघांचे पॅनेल पुढे आले आहे. त्यांच्या विरोधात महाविकास आ-घाडीच्या पॅनेलमधून अभिजित कोळी, दीपाली पाटील व अश्विनी कदम यांनी शड्डू ठोकला आहे. वास्तविक तात्यांसारखा जननायक भाजपच्या पॅनेलपाठीमागे भरभक्कम असल्याने सांगलीवाडीकर दुसरा विचारच करू शकत नाहीत. तरीही संविधानानुसार निवडणूक प्रक्रिया आणि त्यातून सर्वांना प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची संधी दिलीच पाहिजे असे तात्या म्हणतात.

एकूणच महापालिका निवडणूक ही आठ दिवस-ांची असते, त्यात कोणतेही सुडाचे, जाती-धर्माचे राजकारण नको, असा तात्यांचा सर्वांनाच सल्ला अस-तो. त्यातून जनता जनार्दन न्याय करेल असे तात्या सांगतात. आतापर्यंत जनतेने सांगलीवाडी आणि तात्या हे समिकरण जपले आहे.

त्यामुळे याही खेपेला तात्यांचाच तो विकासाचा वारसा जनता अखंडित ठेवतील, असा विश्वास भाजपला आहे. त्यातून पुन्हा एकदा भाजपला संधीच नव्हे तर विकासाची गंगा अखंडित ठेवण्याचे काम मतपेटीतून जनता करेल, असे प्रचारातून दिसून येत आहे.

## सांगलीवाडी माझा श्वास, ध्यास : दिनकरतात्या पाटील

घार उडते आकाशी... चित्त तिचे पिलापाशीफ अशी म्हण माजी आमदार दिनकरतात्या यांना लागू होते. जरी जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांची धडपड असली तरी त्यांचे विशेष लक्ष हे आपल्या सां-गलीवाडीवर अधिक असणे स्वाभाविक आहे. याबाबत तात्या म्हणतात, सांगलीवाडी माझा श्वास अन् ध्यास आहे. सांगलीवाडीच्या प्रत्येकाने माझ्यावर पुत्रवर प्रेम करून मला राजकारणात साथ दिली, भरभरून दिले आहे. शिवाय सांगलीवाडीरूपी माझ्या घरासाठी मला जगातील जे काही सर्वोत्तम आहे ते करायचे आहे. त्यासाठी गेल्या २०१८ ते २०२५ या टर्ममध्ये तब्बल २२ कोटी रुपयांचा विकासनिधी आणून प्रभागाचा कायापालट केला. शेती (पानंद) रस्त्यांसाठी ८० लाखांचा निधी आणून वाटा मोकळ्या केल्या. अजूनही सुसज्ज मैदान, दर्जेदार उद्यान, कृषीपूरक उद्योग, शिक्षणासह एमपीएससी, युपीएससीचे उत्तम प्रशिक्षण केंद्र येथे करायचे आहे. मागणीमुक्त प्रभाग हा आमचा संकल्प आहे.

## केंद्र,राज्याची साथ अन् विकासाची वाट

केंद्रात पंतप्रधान विश्वगुरू नरेंद्र मोदी, महाराष्ट्रात महानायक मुख्यमंत्री देवेंद फडणवीस यांच्या नेतृत्व-ाखाली प्रगतशील विकासाचे वारे वाहात आहे. पी.एम. किसान योजना, लाडकी बहीण, बांधकाम कामगार योजना, आभा कार्ड आदींच्या माध्यमातून सांगलीवाडीत दिकरतात्यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते अजिंक्य पाटील यांनी हजारो कोटींचा लाभ मिळवून दिला. आता त्यांच्या साथीने सौ. मीनल पाटील, सौ. अश्विनी कदम यांच्यासारख्या रणरागिणी अन् जोडीला महाबळेश्वर चौगुले यांच्यासारखे संयमी नेतृत्व या विकासाचे सांगाती होण्यासाठी सज्ज आहेत. अर्थात डबल इंजिनला महापालिकेच्या रूपाने ट्रिपल इंजिन जोडून सांगलीवाडी आणि शहराच्या विकासाची वाट मतदानातून मोकळी होणार आहे.

# सांगलीवाडीत भाजपची भव्य रॅली

**सांगली : प्रतिनिधी**

प्रभाग क्रमांक १३ मध्ये महापालिका निवडणुकीच्या प्रचाराची सांगता आज भाजपच्या भव्य रॅलीने झाली. माजी आमदार दिनकरतात्या पाटील, माजी नगरसेवक अजिंक्य पाटील, माजी नगरसेवक गजानन आलदर तसेच उमेदवार महाबळेश्वर चौगुले, सौ. मीनल पाटील व अनुराधा मोहिते यांच्या नेतृत्वाखाली ही रॅली काढण्यात आली.

रॅलीची सुरुवात श्री हनुमान मंदिरात नारळ फोडून करण्यात आली. हलगी-ताशांचा गजर, फटाक्यांची आतषबाजी आणि भाजपचा विजय असो,

जय श्रीराम, छत्रपती शिवाजी महाराज की जय, कोण म्हणतय येत नाही, आल्याशिवाय राहत नाही, दाढीवाल्या वाघाचा नाद नाही करायचा अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला. रॅलीचा समारोप श्रीराम मंदिरात करण्यात आला.

यानंतर झालेल्या छोटेखानी सभेत माजी नगरसेवक अजिंक्य पाटील यांनी कार्यकर्त्यांना

### प्रचाराची सांगता उत्साहात



संबोधित करत विरोधकांच्या टीकेचा समाचार घेतला. १६ तारखेला विजय आपलाच आहे. जल्लोषासाठी सज्ज रहा,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी नगरसेवक हरिदास पाटील यांनी विरोधकांच्या आरोपांना उत्तर देताना, सात वर्षे सोबत असताना मी चांगला आणि चार दिवस विरोधात गेल्यावर विकला गेल्याचा आरोप केला जातो. विकला जाणारा हरिदास पाटील नाही, असे स्पष्ट केले. तसेच भाजपच्या तिन्ही उमेदवारांना मतदान करून विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

या प्रचारफेरीत के.डी.सी. बँकेचे गजानन पाटील, विकास सोसायटीचे अध्यक्ष सर्जे राव पाटील, वसंतदादा कारखान्याचे माजी संचालक शिवाजीभाऊ पाटील,

सोसायटीचे माजी अध्यक्ष भगवान हारगुडे, आनंदराव कोरे, रघुनाथ पाटील, सुनील पाटील, प्रवीण पाटील, नरेंद्र वाडकर, मारुती भिसे, रंगराव पाटील, अवधूत जामदार, दीपक हारगुडे, कैलास पाटील, शंकर पाटील, प्रताप जामदार, भरत बर्गे, दत्ता पाटील, रमेश भैय्या पाटील, ज्ञानेश पवार, सुरेश पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व महिला उपस्थित होत्या. नितेश कोळी यांनी आभार मानले. भाजपच्या या भव्य रॅलीने सांगलीवाडीत प्रचाराची सांगता मोठ्या उत्साहात आणि जोशात झाली.

# सांगलीवाडीचे मैदान भाजपाच मारणार

### मतदारांच्या प्रतिसादाच्या जोरावर प्रभागातील तिन्ही उमेदवारांचा निर्धार

**सांगली : प्रतिनिधी**

सांगलीवाडी प्रभाग १३ मध्ये भाजपाचे उमेदवार महाबळेश्वर चौगुले, मीनल पाटील व अनुराधा मोहिते यांना लोकांतून पाठिंबा वाढतो आहे. प्रचारात भाजपाने मुसंडी मारली आहे.

मंगळवार दि. १३ रोजी प्रचारफेरी काढण्यात येणार आहे. या फेरीत उमेदवारांसह पक्षाचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. प्रचार फेरीच्या माध्यमातून भाजप आपली ताकद दाखवणार आहे. मतदारांशी थेट संवाद साधण्याचा हा प्रयत्न महत्त्वाचा मानला जातो. प्रभाग १३ मध्ये



भाजपाच्या उमेदवारांना मिळणारा वाढता पाठिंबा, जोमाने सुरू असलेला प्रचार आणि उद्याची होणारी प्रचारफेरी पाहता भाजपाने निवडणुकीच्या रणांगणात निर्यायक मुसंडी मारल्याचे चित्र आहे.

प्रभागात रविवारी आणि सोमवारी झालेल्या बैठकांना मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्यामुळे उमेदवारांमध्येही उत्साहाचे वातावरण आहे.

आजपर्यत केलेली विकासकामे ही प्रचाराचा प्रमुख मुद्दा आहे. त्यामुळे सर्वच समाजातून उमेदवारांना पाठिंबा वाढला आहे.

त्यावेळी मा. आमदार दिनकर पाटील, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे नेते हरिदास पाटील, माजी नगरसेवक गजानन आलदर, आप्पा वारद,

सुरेश सुतार, रा.शा. पाटील, शंकर दळवी, पोपट पाटील, अनिल पाटील, प्रशांत पाटील, शुभम पाटील, दत्ता पवार उपस्थित होते.




## लढाई सत्तेची नसून ती 'डेटा'आणि 'तंत्रज्ञानाची'

महाराष्ट्राच्या राजकारणात महानगरपालिका निवडणुकांकडे 'मिनी विधानसभा' म्हणून पाहिले जाते. आजवर या निवडणुकांचे स्वरूप गल्लीबोळातील चुरस, भिंतींवरील चुना आणि रंगाने माखलेले पोस्टर्स, रिक्षावरचे कर्कश भोंगे आणि कार्यकर्त्यांच्या घोषणांनी गाजणाऱ्या या निवडणुका आता पूर्णपणे 'हायटेक' झाल्या आहेत. मात्र, २०२६ च्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या या निवडणुकांनी प्रचाराची सर्व जुनी समीकरणे मोडीत काढली आहेत. यंदाची ही लढाई केवळ सत्तेची नसून ती 'डेटा' आणि 'तंत्रज्ञानाची' बनली आहे. प्रत्यक्ष रणांगणापेक्षा सोशल मीडियाच्या आभासी विश्वात सुरू असलेली ही 'डिजिटल रणधुमाळी' लोकशाहीच्या प्रक्रियेत एक नवे वळण घेऊन आली आहे. बदलत्या काळाची बदलती निवडणूक भारतातील लोकशाहीचा कणा मानल्या जाणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विशेषतः महानगरपालिकांच्या निवडणुका आता केवळ गल्लीतील राजकारण उरलेल्या नाहीत. हे या डिजिटल प्रचार प्रक्रियेतून दिसून येते.

### पारंपरिक प्रचार ते डिजिटल प्रचार

काही वर्षांपूर्वीपर्यंत रिक्षावर लाऊडस्पीकर लावून होणारा प्रचार आणि झेंडे-बॅनरवर उमेदवारांचा भर असायचा. मात्र, आता काळ बदलला आहे. व्हॉट्सअॅप स्टेटसपासून ते यूट्यूब शॉर्ट्सपर्यंत प्रत्येक प्लॅटफ फॉर्मवर प्रचाराची चढाओढ पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे, केवळ मोठ्या नेत्यांच्या सभाच नव्हे, तर गल्ली-गल्लीत वा कोपऱ्यावर असलेल्या सभांचेही आता 'लाईव्ह स्ट्रीमिंग' केले जात आहे, ज्यामुळे प्रभागातील प्रत्येक मतदाराला घरबसल्या उमेदवाराचे विचार ऐकता येत आहेत. प्रचाराचा बदललेला पोत

काही वर्षांपूर्वीपर्यंत निवडणुकीची चाहूल ही शहरात लागणाऱ्या मोठ्या होर्डिंग्सवरून लागत असे. 'ताई, माई, अक्का, विचार करा पक्का' किंवा 'आमच्या प्रभागाचा विकास, हाच आमचा ध्यास' अशा घोषणांनी वातावरण निर्मिती केली जात असे. मात्र, आजच्या काळात मतदारांचे लक्ष भिंतींकडे कमी आणि हातातील पाच इंची मोबाईल स्क्रीनकडे जास्त आहे. त्यामुळेच उमेदवारांनी आपली रसद आता सोशल मीडियाच्या रणांगणावर वळवली आहे. पूर्वी पदयात्रांमध्ये हजारोंची गर्दी जमवणे हे शक्तीचे प्रतीक मानले जाई. आता फेसबुक लाईव्हला मिळणारे 'व्ह्यूज' आणि इन्स्टाग्राम रीलला मिळणारे 'लाईक्स' यावरून उमेदवाराची लोकप्रियता मोजली जात आहे. 'मतदार राजा जागा हो' म्हणण्यापेक्षा 'मतदार राजा मोबाईल उघड' अशी ही स्थिती आहे.

### प्रचाराची नवी अस्त्रे

यंदाच्या निवडणुकीत उमेदवारांनी प्रचारासाठी काही खास तांत्रिक साधनांचा अवलंब केला आहे त्यामुळे एक घरबसल्या लोकांना झट की पट गोष्टी समजतात. त्यामध्ये एआय (अख) आणि डेटा सायन्स- यंदाच्या निवडणुकीचे सर्वात मोठे आकर्षण ठरले आहे. 'कृत्रिम बुद्धिमत्ता' अर्थात ईीींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश (अख) चा वापर जास्त होत आहे.

### वैयक्तिकृत संपर्क (Persona-lization)

एआयच्या मदतीने उमेदवार आता मतदारांना त्यांच्या नावाने वैयक्तिकृत मेसेज किंवा कॉल करत आहेत. जेव्हा मतदाराला स्वतः च्या नावाने खास रेकॉर्ड केलेला उमेदवाराचा संदेश ऐकू येतो, तेव्हा त्याला आपलेपणाची जाणीव होते. व्हर्च्युअल अवतार- अनेक उमेदवार प्रत्यक्ष मतदारांपर्यंत पोहोचू शकत नाहीत, तिथे त्यांचे 'एआय अवतार' संवादाची धुरा सांभाळत आहेत.

### डेटा आधारित रणनीती

मतदार यादीतील डेटाचे विश्लेषण करून कोणत्या भागातील लोकांचे काय प्रश्न आहेत, हे आता संगणकीय प्रणालीद्वारे शोधले जात आहेत. उदा. जर एखाद्या वस्तीत पाणीटंचाई असेल, तर त्या भागातील मतदारांना केवळ पाणीप्रश्नावर भाष्य करणाऱ्या जाहिरातीच सोशल मीडियावर दाखवल्या जात आहेत.

### हायपर-लोकल टार्गेटिंग

अचूकता आणि वेध- डिजिटल प्रचाराचा सर्वात मोठा फायदा म्हणजे 'नेमकेपणा'. वर्तमानपत्रात किंवा टीव्हीवर जाहिरात दिल्यास ती संपूर्ण शहराला दिसते, ज्यात खर्च जास्त असतो. मात्र, फ सबुक आणि मेटाच्या आधुनिक यंत्रणेमुळे उमेदवार आता केवळ आपल्या प्रभागातील, विशिष्ट वयोगटातील किंवा विशिष्ट आवडी असलेल्या मतदारांपर्यंतच पोहोचत आहेत. २२ ते ३५ वयोगटातील तरुणांना रोजगारावर आधारित जाहिराती, तर ज्येष्ठ नागरिकांना आरोग्य सुविधांवर आधारित जाहिराती दाखवून उमेदवार त्यांचे मन जिंकण्याचा प्रयत्न करत आहेत. इन्फ्लुएन्सर मार्केटिंग आणि 'मीम्स'चे युद्ध- राजकीय भाषणांना लोक आता कंटाळले आहेत, हे ओळखून उमेदवारांनी 'मिश्किल' मार्ग निवडला आहे.

### सोशल मीडिया स्टार्स

स्थानिक पातळीवर प्रसिद्ध असलेले यूट्यूबर्स किंवा इन्फ्लुएन्सर्स आता उमेदवारांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. एखादा लोकप्रिय रील स्टार जेव्हा उमेदवारासोबत चहा पिताना दिसतो, तेव्हा तो संदेश हजारो तरुणांपर्यंत सहज पोहोचतो.

# मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण

**महर्षि डॉ. सी. डी. देशपांडे यांचा १४ जानेवारी हा जन्मदिन राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून गेली कित्येक वर्षे विविध उपक्रम करून साजरा केला जातो. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ 'पृथ्वीचा गोल' असा होतो. 'भूगोल' हा शब्द इंग्रजीतील 'Geography' या शब्दासाठी पर्याय म्हणूनही वापरला जातो. लॅटिनवरून आलेल्या या शब्दाचा अर्थ 'भूवर्णन शास्त्र'.**

भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र तसेच पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजेही भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. अशा या भूगोलाची विभागणी तीन गटात म्हणजे १) प्राकृतिक भूगोल २) मानवी भूगोल व ३) प्रादेशिक भूगोल अशी केली जाते. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे :

- **प्राकृतिक भूगोलात** भूरुपशास्त्र, हवामानशास्त्र, जैविक भूगोल यांचा समावेश होतो. तसेच यासोबत किनारी प्रदेश, खनिजस्त्रोत आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही समावेश प्राकृतिक भूगोलात होतो.
- **मानवी भूगोलात** ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो.
- **प्रादेशिक भूगोलात** पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्त्रोतांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो.


भूगोलाच्या सखोल आणि सविस्तर अभ्यासात अनेकविध पद्धतींचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र निरीक्षण, नकाशे यांना भूगोलात महत्त्वाचे स्थान तर आहेच पण आजकाल दूरसंवेदी कृत्रिम उपग्रहांचा वापर, हवाई छायाचित्रण यांनी भूगोलाच्या निरीक्षण क्षमतेत क्रांतिकारक भर घातली आहे. त्यामुळे बदलत्या युगात भूगोलाच्या अभ्यासाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

### भूगोल विषयाचे महत्त्व व व्याप्ती

भूगोलात संख्याशास्त्राच्या वापरामुळे नेमकेपणा, गणिती अचूकता व निष्कर्ष क्षमता आली यातून भावी घटनांबद्दल अनुमान काढण्याच्या क्षमताही आल्या यामुळे स्वतःचा आशय नसणारा केवळ वर्णनात्मक विषय असे स्वरूप न राहता भूगोलशास्त्र Science of Geography हे स्वरूप भूगोलाला प्राप्त झाले आहे. भूगोलाचे महत्त्व वेगळे सांगण्याची गरज नाही. आपण जगतो ते जग व विश्व याचे नेमके स्वरूप, विविध भूप्रदेश व तेथील जीवन, निसर्ग त्यातील संशाधनस्रोत व मानव यांचे परस्पर संबंध इत्यादी महत्त्वाच्या बाबींचे ज्ञान भूगोलामुळे होते. वेगवेगळे देश, लोक व तेथील समस्यांचे ज्ञान होते.

पृथ्वीवरील भौतिक, जैविक आणि मानवी घटकांचे वितरण व त्यांची आंतरक्रिया यांचे स्पष्टीकरण भूगोलातून मिळते. संशोधन व विश्लेषणामुळे संसाधनांचे व्यवस्थापन, पर्यावरणीय समस्या (पूर, दुष्काळ) यांचे विश्लेषण शक्य होते. मानव संसाधनाच्या विकासाशी संबंधित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये भूगोलतज्ज्ञांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे.

पर्यावरणशास्त्र, भूमी उपयोजन व घरांची बांधणी, नगररचना, हवामानशास्त्र, पर्यटन विभाग, नकाशाशास्त्र, सागरशास्त्र, हवाई छायाचित्रण, जी.पी.एस. (ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम) तंत्रज्ञान, जी.आय.एस. भौगोलिक माहितीप्रणाली (जिओग्राफिक इन्फर्मेशन सिस्टीम) अतिप्रगत तंत्रज्ञान इत्यादी सर्व विषय भूगोलात अभ्यासले जातात. भूगोल हा केवळ एक विषय नसून स्पर्धात्मक परीक्षा MPSC व UPSC परीक्षांमधील अभ्यासाचा महत्त्वाचा भाग समजला जातो.




### पृथ्वीचे सूर्य सन्मुख आणि विन्मुख होणे अर्थात उत्तरायण व दक्षिणायन

पृथ्वीच्या आसाच्या तिरपेपणामुळे सूर्याचे उत्तर व दक्षिण दिशेकडे होणारे भासमान चलन म्हणजे उत्तरायण व दक्षिणायन होय. पृथ्वीच्या आसाचा तिच्या परिभ्रमण कक्षेच्या प्रतलाशी होणारा कोन ६६.५ अंशाचा आहे. याचाच अर्थ पृथ्वीचा अक्ष तिच्या कक्षेच्या संदर्भात २३.५ अंशानी झुकलेला आहे. पृथ्वीच्या तिरप्या आसामुळे पृथ्वी सूर्याभोवती परिभ्रमण करताना वर्षातील सहा महिने पृथ्वीचा उत्तर गोलार्ध तर सहा महिने दक्षिण गोलार्ध सूर्यासमोर झुकलेला असतो. पृथ्वीच्या गोलार्धाचे हे सूर्यसन्मुख व विन्मुख होणे किंवा सूर्याच्या भासमान सरकण्याला 'अयन' म्हणतात. दरवर्षी २२ डिसेंबरपासून सूर्य मकरवृत्तावरून उत्तरेकडे सरकू लागतो. तो २२ मार्च रोजी विषुववृत्तावर पोचून तसाच उत्तरेकडे सरकत २१ जून रोजी कर्कवृत्तावर पोचतो. या दिवशी सूर्यकिरणे कर्कवृत्तावर लंबरूप पडतात. हा उत्तर गोलार्धातील सर्वात मोठा दिवस होय. आपला भारत देश उत्तर गोलार्धातच वसलेला आहे. दिनांक २२ डिसेंबर ते २१ जून या कालावधीत सूर्य रोज थोडा थोडा उत्तरेकडे सरकतो. या कालावधीस 'उत्तरायण' असे म्हणतात.

### भूगोल दिनाचे महत्त्व

तारखेनुसार उत्तरायणाची सुरुवात २२ डिसेंबर रोजी असली तरी भारतीय तिथीनुसार ती पौष महिन्यात म्हणजे जानेवारीत होते. तसेच १४ जानेवारी रोजी येणाऱ्या मकरसंक्रांतीतील सूर्य धनू राशीतून मकरराशीत प्रवेश करतो. सूर्याचा एका राशीतून दुसऱ्या राशीत जाण्याचा काळ साधारणपणे एक महिना असतो. अशा बारा राशीतून बारा महिने त्याचा प्रवास सुरू असतो. १४ जानेवारी रोजी होणाऱ्या मकरसंक्रमणात (यंदा १५ जानेवारी) सूर्याच्या ऊर्जेचे संक्रमण होते. म्हणून हा दिवस भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशीच्या विविध उपक्रमांत भौगोलिक प्रदर्शनांमध्ये भौगोलिक प्रतिकृती, नकाशे, तक्ते, खडकांचे, मातीचे, खनिजांचे नमुने ठेवले जातात. भौगोलिक सहलींचे आयोजन केले जाते. भौगोलिक हस्तलिखितांचे प्रकाशन केले जाते. भूगोलतज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. शालेय कार्यक्रमात भूगोल दिनाचे महत्त्व सांगितले जाते. आयुका, CWPRS इत्यादी नामांकित संस्थांना भेटी दिल्या जातात आणि हा 'भूगोल दिन' साजरा केला जातो.

# प्रख्यात भारतीय भूगोलशास्त्रज्ञ, 'भूगोल महर्षी' : डॉ. सी. डी. देशमुख

दरवर्षी १४ जानेवारी हा दिवस मकरसंक्रांतीबरोबरच संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन (National Geography Day) म्हणूनही साजरा केला जातो. भूगोल हा विषय आपण शालेय जीवनापासून शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. त्याशिवाय १४ जानेवारी हा दिवस आणखी एका कारणासाठी प्रसिद्ध आहे आणि खूपच कमी लोकांना याबद्दल माहिती आहे. प्रख्यात भारतीय भूगोलशास्त्रज्ञ चंद्रशेखर धुंडीराज देशपांडे (डॉ. सी. डी. देशमुख) यांच्या जयंतीनिमित्तसुद्धा भूगोल दिन साजरा केला जातो कारण भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलाचे ज्ञान अफलातून होते, त्यामुळे त्यांना 'भूगोल महर्षी' असे म्हटले जाते. भूगोल महर्षी डॉ. सी. डी. देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यामुळे त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थही १४ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिवस म्हणून साजरा केला जातो.

देशाच्या पातळीवरील भूगोल विषय-तज्ज्ञ प्रोफेसर चं. धुं. ऊर्फ सी. डी. देशपांडे यांचा अमृतमहोत्सवी सत्कार १९८६ मध्ये पुणे येथे पं. भीमसेन जोशी यांच्या झाला होता. पुण्यातील पत्रकार, लेखक डॉ. सुरेश गरसोळे यांनी तो घडवून आणला होता. तेव्हापासून मकरसंक्रांतीच्या दिवशी डॉ. देशपांडे यांचा जन्मदिन महाराष्ट्रभर भूगोल दिन म्हणून विशेषतः शालेय पातळीवर सुरू आहे. मकरसंक्रांतीला मुलांना शाळेत तिळगूळ वाटला जातो. ऋतुबदल होण्याचा हा दिवस भूगोलात महत्त्वाचा आहे. म्हणून याच दिवशी ङ्गभूगोल दिनफ साजरा करण्याचे ठरले. त्यानुसार भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचे उपक्रम निवडले जातात. व्याख्याने, ध्वनिफिती दाखवून भौगोलिक घटकांचे महत्त्व सांगणे, भौगोलिक सहली, नकाशे व




इतर भौगोलिक साहित्याची प्रदर्शने, भौगोलिक विषयावर निबंध लिहिणे, इतर विषयांशी असलेला भूगोलाचा सहसंबंध असे अनेक उपक्रम घेतले जातात. वर्षांतून एकदा तरी या विषयावर लक्ष केंद्रित व्हावे, या उद्देशाने अनेक उपक्रम घेतले जातात.

अलीकडे या विषयाचे महत्त्व सर्वच संबंधितांना कळेनासे झाले आहे. शालेय पातळीवर तर सर्वच संबंधित मंडळी केवळ ४० गुणांचा विषय म्हणून त्याकडे दुर्लक्षित करतात. फक्त इंग्रजी, विज्ञान व गणित हेच जणू शालेय विषय असल्याचे मानून सामाजिक शास्त्रांकडे अक्षम्य दुर्लक्ष करतात. खरं म्हणजे विकासाच्या कोणत्याही समस्येमध्ये स्थानिक भूगोलाचे ज्ञान महत्त्वाचे असते. गाव आणि पंचक्रोशीचा भूगोलदेखील स्थानिक समस्या सोडविण्यास उपयोगी ठरतो. मात्र शासनाने फारसा विचार न करता ङ्गजिल्हा - भूगोलफही संकल्पनाच सोडून दिली असे इयत्ता तिसरीच्या अभ्यासक्रमावरून लक्षात येते. तसा भूगोल... शालेय जीवनातील बहुतेकांचा नावडता विषय, मात्र तेवढाच उत्साहवर्धक विषय. या भूगोलाच्या विषयी जनसामान्यात असणारी भीती दूर व्हावी, त्याचे महत्व लोकांना समजावे, या उद्देशानेही भारत सरकारकडून साजरा करण्यात येणारा दिवस म्हणजे 'राष्ट्रीय भूगोल दिन'. तसेच मकर संक्रातीला अर्थात १४ जानेवारीला हा दिवस साजरा करण्यात येतो याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सूर्याचे उत्तर गोलार्धातून दक्षिण गोलार्धात भ्रमण सुरु होते म्हणून भारतीय पंचागात संक्रातीला अतिशय महत्त्व आहे.

### शिवरायांची युद्धनीतीही लष्करी भूगोलावर

छत्रपती शिवाजी महाराज यांची युद्धनीती लष्करी भूगोलावर आधारीत होती. आपले राजस्थानी आणि गुजराती बांधव पिढीजात व्यवसाय करू शकतात. याची कारणे तेथील भौगोलिक परिस्थितीशी परिणाम साधणारी आहेत. आपल्याकडे हिवाळ्यात उत्तर गोलार्धातून स्थलांतरीत पक्षी येतात. याचे कारणसुद्धा भूगोलाशी संबंधित आहे. सध्या आपण अत्यंत विषम परिस्थिती अनुभवत आहोत. तसेच आपण सध्या रस्त्याने जाताना आपणास ठिकठिकाणी रस्त्याची मोजणी करताना दिसतात. तो सुद्धा भुगोलाचा भाग असतो.

## ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर नाविन्यपूर्ण शोसह झाला संपन्न

**मुंबई : प्रतिनिधी**



ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूर २०२५ चा भव्य आणि लक्षवेधी प्रवास गुरुग्राम, जयपूर आणि कोलकाता या शहरांमध्ये फॅशन अनुभवांचा नवा मापदंड ठरवत यशस्वीपणे संपन्न झाला. 'द वन अँड ओन्ली' या खास स्टेजच्या माध्यमातून भविष्यातील फॅशनची दिशा ठरवणारा सूर या टूरने बांधला. फॅशन कशी अनुभवली जाते, साजरी केली जाते आणि कल्पनेत उभी राहते, याच्या मर्यादा ओलांडणाऱ्या तीन क्रांतिकारी कथानकांचे सादरीकरण या दौऱ्यात करण्यात आले.प्रत्येक शहरात ब्लेंडर्स प्राईड फॅशन टूरने फॅशनला चालना दिली. गुरुग्राममध्ये तंत्रज्ञान आणि कुट्युअर यांचा थेट संगम साधत फॅशनला 'फ्युचरव्हर्स'मध्ये नेले गेले. जयपूरमध्ये हाय-ऑक्टेन मोटरस्पोर्ट सौंदर्यशैलीसह फॅशनला वेगवान मार्गावर आणण्यात आले, तर कोलकातामध्ये आधुनिक रूप देण्यात आले.

## टोयोटा किर्लोस्कर मोटरने तांत्रिक उत्कृष्टता केली सादर

**मुंबई : प्रतिनिधी**



टोयोटा किर्लोस्कर मोटरने अॅडवाण्टेज महाराष्ट्र एक्स्पो २०२६ मध्ये सहभाग घेतला, जेथे महाराष्ट्रातील कौशल्य विकास उपक्रमांच्या माध्यमातून शाश्वत गतीशीलता, जबाबदार उत्पादन आणि तरूणांचे सक्षमीकरण करण्याप्रती आपली कटिबद्धता अधिक दृढ केली आहे. या एक्स्पोमध्ये सहभाग घेण्यासह टोयोटा फ्लेक्स-फ्यूएल स्ट्राँग हायब्रिड इलेक्ट्रिक वेईकल तंत्रज्ञानाच्या क्षमतेला प्रकाशझोतात आणत आहे. एक्स्पोमधील पॅव्हिलियनमधून उद्योग सहयोग आणि तंत्रज्ञानाबाबत जागरूकतेप्रती टीकेएमचा केंद्रित दृष्टिकोन देखील दिसून आला, जो भारताच्या ऊर्जा परिवर्तन ध्येयांशी संलग्न आहे. आघाडीची उद्योग संस्था एमएएसएसआयए महाराष्ट्र सरकारसोबत सहयोगाने या प्रदर्शनाचे आयोजन करते.

## अदानी पोर्ट्सच्या देशातील पहिल्या व्हीएलसीसीचे यशस्वी बर्थिंग




**अहमदाबाद : प्रतिनिधी**

भारताच्या सागरी आणि ऊर्जा पायाभूत सुविधांच्या प्रवासात एक ऐतिहासिक टप्पा गाठत, अदानी पोर्ट्स अँड स्पेशल इकॉनॉमिक झोन लिमिटेड यांनी मुंद्रा बंदरावर देशातील पहिल्या पूर्णतः भरलेल्या व्हेरी लार्ज क्रूड कॅरियरचे यशस्वी बर्थिंग झाल्याची घोषणा केली.एमटी न्यू रिनाउन या जहाजाची एकूण कार्गो क्षमता सुमारे ३.३ लाख घनमीटर असून, थेट जेटीवर बर्थिंग झाल्याने मुंद्रा हे भारतातील असे पहिले बंदर ठरले आहे. या महत्त्वपूर्ण यशामुळे, पूर्णतः भरलेल्या व्हीएलसीसीसाठी थेट जेटी बर्थिंग सुविधा असलेल्या जगातील मोजक्या बंदरांमध्ये मुंद्रा बंदराचा समावेश झाला आहे.

## हॅरियर आणि सफारीची बहुप्रतीक्षित पेट्रोल आवृत्ती लॉन्च

**मुंबई : प्रतिनिधी**




टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स लिमिटेड या भारतातील आघाडीच्या एसयूव्ही उत्पादक कंपनीने आज १.५ लिटर हायपेरियन टर्बो-जीडीआय पेट्रोल इंजिनवर चालणाऱ्या हॅरियर आणि सफारी या त्यांच्या बहुप्रतीक्षित गाड्यांच्या किंमती जाहीर केल्या आहेत. या किंमती त्यांच्या सेगमेन्टमध्ये स्पर्धात्मक आहेत. हॅरियर पेट्रोलची सुरुवात १२.८९ लाख रु. (एक्स-शोरूम, नवी दिल्ली) पासून होत असून सफारी पेट्रोल १३.२९ लाख रु. (एक्स-शोरूम, नवी दिल्ली) पासून उपलब्ध आहे. एकंदरित, या गुणांमुळे प्रत्येक प्रवास सुखद होतो. हे गुण हॅरियर आणि सफारीला या सेगमेन्टमधील सर्वोत्तम पर्याय म्हणून स्थापित करतात.

* 'प्रभात संगम' हे साप्ताहिक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा सावर्डे-पाटील यांच्याकरिता मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली-४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून 'नोकरी न्यूज' कार्यालय, ब्लॉक नं. एफ, कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँडजवळ, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **Email : prabhatsangam2013@gmail.com**
* **संपादक : गणेश बंडा सावर्डे-पाटील.** * या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुराशी मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही. * न्यायालयीन वाद विवाद सांगली न्यायकक्षेत.

## आजच्या पिढीने संस्कृत संभाषण कौशल्य शिकावे : रवींद्र केसरकर



नृसिंहवाडी : प्रतिनिधी

आजच्या पिढीने संस्कृत संभाषण कौशल्य आत्मसात करावे, कारण संस्कृत ही भारताची प्राचीन, शास्त्रीय आणि सर्व भाषांची जननी आहे, असे प्रतिपादन स्वामी विवेकानंद प्रतिष्ठानचे प्रमुख रवींद्र केसरकर यांनी केले.

येथील विश्वंभर हॉलमध्ये 'संस्कृत भारती' पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या वतीने आयोजित निशुल्क संस्कृत संभाषण शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी नरेंद्र मोदी विचार मंच शिरोळ तालुका अध्यक्ष कुलदीप ढवळे होते. दीपप्रज्वलन व सरस्वती पूजनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. १४ जानेवारीपर्यंत दररोज सायंकाळी ४ ते ६ या वेळेत हे शिबिर होणार आहे. यावेळी सदाशिव उर्फ संजय ढवळे यांनी संस्कृत भाषेचे महत्त्व सांगून, सोप्या पद्धतीने संभाषण करता यावे यासाठी हे शिबिर उपयुक्त ठरेल, असे नमूद केले. उपस्थित प्रशिक्षणार्थींना त्यांनी मार्गदर्शन केले.

# सराव परीक्षेने ग्रामीण मुलांमध्ये निर्माण केला आत्मविश्वास

ईश्वरपूर : प्रतिनिधी



राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष आणि युवा नेते प्रतिकदादा पाटील यांच्या संकल्पनेतून, कामगार कल्याण व जिमखाना समितीच्या अध्यक्षा व कारखान्याच्या संचालिका डॉ. सौ. योजना शिंदे-पाटील यांच्या पुढाकाराने साखराळे येथील राजारामबापू पाटील खुल्या मैदानात पोलीस भरती प्रक्रियेचा सराव आयोजित करण्यात आला. या सराव परीक्षेत मुला-मुलींमध्ये "आपणही पोलीस भरती होऊ शकतो" असा आत्मविश्वास निर्माण झाला.

या जर्मन तंत्रज्ञानावर आधारित सराव परीक्षेत सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, पुणे आदी जिल्ह्यांतील १२०० पेक्षा जास्त मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. माजी मंत्री आ. जयंतराव पाटील आणि युवा नेते प्रतिकदादा पाटील यांनी प्रत्यक्ष मैदानावर उपस्थित राहून मुलांना मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

सराव परीक्षेची सुरुवात आ. जयंतराव पाटील यांनी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करून केली. दिवसभर मुलांसाठी १६०० मीटर आणि १०० मीटर धावणे तसेच गोळाफेक, तर मुलींसाठी ८०० मीटर, १०० मीटर आणि गोळाफेक या परीक्षा घेण्यात आल्या. प्रत्येक परीक्षार्थीच्या कामगिरीचे अचूक मोजमाप जर्मन तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात आले आणि त्यांना मार्गदर्शन दिले गेले.

आ. जयंतराव पाटील म्हणाले, "हा आगळा-वेगळा प्रयोग ग्रामीण मुलांमध्ये पोलीस भरतीची भीती कमी करेल आणि नवीन आत्मविश्वास निर्माण करेल."

प्रतिकदादा पाटील म्हणाले, "अद्यावत तंत्रज्ञानामुळे मुलांना आपली कामगिरी सुधारण्याची संधी मिळाली आहे. भविष्यातही अशा भरती व सराव उपक्रम राबवू."

संचालिका डॉ. सौ. योजना शिंदे-पाटील, शशिकांत जगताप, पवन भोसले-पाटील, अनिकेत पाटील तसेच विविध स्पर्धा परीक्षा अकॅडमीचे संचालक व स्वयंसेवक यांनी या सराव परीक्षेची यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. याप्रसंगी वाळवा तालुका युवक राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष संग्राम जाधव, त्यांच्या सहकारी, कारखान्याचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांना आळा घाला, अन्यथा रस्त्यावर उतरू



शिराळा : प्रतिनिधी

● रणधीर नाईकांचा इशारा

उपवळे (ता.शिराळा) येथे बुधवारी रात्री बिबट्याच्या हल्ल्यात जखमी झालेल्या स्वरांजली संग्राम पाटील या बालिकेची जिल्हा परिषदचे माजी सदस्य रणधीर नाईक यांनी शिराळा उपजिल्हा रुग्णालयात भेट घेऊन विचारपूस केली.

यावेळी नाईक यांनी बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांवर तीव्र चिंता व्यक्त करत शासनाने वनविभागाच्या कायद्यात तातडीने बदल करून शेतात व नागरी वस्तीत आलेल्या बिबट्याला ठार करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केली. अन्यथा नागरिक गप्प बसणार नाहीत आणि शासनाविरोधात मोठा लढा उभा राहील, असा इशाराही त्यांनी दिला.

शिराळा तालुक्यात गेल्या काही वर्षांत बिबट्यांच्या हल्ल्यांमध्ये मृत्यू व गंभीर जखमी होण्याच्या अनेक घटना घडल्या असून त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. हे थांबवण्यासाठी शासनाने ठोस व कठोर निर्णय घ्यावा, अशी मागणी नाईक यांनी केली.

# जागतिक दर्जाच्या संशोधनाकडे वाटचाल करा : डॉ. विनायक पारळे

तिटवे : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी केवळ पदवीपुरते मर्यादित न राहता जागतिक स्तरावर संशोधनाचा विचार केला पाहिजे. आंतरराष्ट्रीय संशोधन संधींचा लाभ घेतल्यास ज्ञान, कौशल्य आणि दृष्टीकोन अधिक व्यापक होतो, असे प्रतिपादन जपान मधील हिरोशिमा विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ.विनायक पारळे यांनी केले. ते शहीद महाविद्यालयात आयोजित विदेशातील संशोधन संधी या विषयावरील व्याख्यानात बोलत होते.

डॉ. पारळे यांनी आपल्या व्याख्यानात कोरिया जपान यांसारख्या देशांमधील संशोधन व्यवस्था, आधुनिक प्रयोगशाळा, आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि उपलब्ध फेलोशिप संधी यांची सविस्तर माहिती दिली. संशोधन संस्कृती, शिस्तबद्ध कार्यपद्धती आणि तंत्रज्ञानाधारित अभ्यास यावर त्यांनी प्रकाश टाकला.



संशोधन ही केवळ वैयक्तिक प्रगतीची प्रक्रिया नसून समाज आणि देशाच्या विकासासाठी महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी जिज्ञासा, सातत्य आणि चिकाटी ठेवून संशोधन क्षेत्रात काम केले पाहिजे असे डॉ. सुधीर कुलकर्णी यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक प्राचार्य प्रशांत पालकर यांनी केले, तर समन्वयक म्हणून प्रा.विशालसिंह कांबळे यांनी भूमिका पार पाडली. सूत्रसंचालन प्रा. सुप्रिया पाटील यांनी केले. यावेळी उपप्राचार्य सागर शेटगे, प्रा.दिग्विजय कुंभार, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## श्री यल्लम्मा देवीच्या यात्रेची यशस्वी सांगता

घाटनांद्रे : प्रतिनिधी

'उदं ग आई उदं' च्या गजरात,भंडारा खोबर्याच्या उधळणीत व पारंपारिक वाद्यांच्या निनादात भव्य दिव्य अश्या पालखी मिरवणूकीने घाटनांद्रे (ता कवठेमहांकाळ) येथील श्री यल्लम्मा देवीच्या यात्रेची सांगता झाली.यात्रेनिमीत विविध प्रकारच्या धार्मिक,सांस्कृतीक व कुस्तीच्या मैदानाचे आयोजन करण्यात आले होते.याला भाविक भक्तांनी मोठीच दाद दिली.

शनिवार दिनांक ३ रोजी देवीची बोणी व नैवेद्य पार पडला.यादिवसी मंदिर परिसरात अगदी पहाटे पासूनच देवीच्या दर्शनासाठी लांबच्या लांब रांगा लागल्या होत्या.मंदीर परिसर हा भावीक भक्तांनी चांगलाच फुलून गेला होता.मंदीर परीसरास मोठ्या प्रमाणात विद्युत रोषणाई करण्यात आली होती.या दिवसी सायंकाळी सात वाजता वगसम्राट साधु आत्मा कासेगावकर यांचा लोकनाट्य तमाशाचा कार्यक्रम पार पडला.त्याचे उदघाटन देणगीदार व सुभेदार पोपटराव शिंदे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.



तर रविवार दिनांक ४ हा यात्रेचा मुख्य दिवस होता.यादिवसी सकाळी नऊ वाजता खाडेंच्या मेटा पासून खर्या आर्थीने पालखी मिरवणूकीस सुरुवात करण्यात आली.सदर पालखी ही घरोघरी फिरून मानाचा आहेर स्वीकारत पुजाराचे घर व्हाया देवीचे मंदिर करत किचाच्या माळाकडे गेली.तिथे किचाचा कार्यक्रम होऊन यात्रेची सांगता करण्यात आली.सदर दिवशी चार वाजता भव्यदिव्य असे कुस्ती मैदान झाले.यामध्ये अनेक लहानमोठ्या चटकदार अश्या कुस्त्या कुस्ती शैकिनांना पहावयास मिळाल्या.याच दिवशी सकाळी दहा वाजल्या पासून पुन्हा तोच लोकनाट्यचा कार्यक्रम झाला.

यात्रेत पाळणेवाले, खेळणीवाले, मिठाईवाले, पेढेवाले यासारख्या व्यापार्याची मोठी रेलचेल दिसून आली. यात्रा कमेटी व पोलीस प्रशासन यांनी यात्रेत चोख बंदोबस्त ठेवला होता.तर सोमवार दिनांक ५ रोजी सायंकाळी सात वाजता वैभव म्युझिकल नाईट कोल्हापूर हा आर्केस्ट्रा पार पडला त्याचे विधीवत उदघाटन देणगीदार व मराठा बुलियन रिफायनरी सोनीपतचे अमोल साहेबराव शिंदे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

# जिद्द,परिश्रम व जिज्ञासूवृत्ती जीवनातील यशाची त्रिसूत्री : प्रसाद तलाठी

## चंपाबेन शाळेचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

तासगाव : प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच अवांतर वाचन व व्यायामावर भर दिला पाहिजे तसेच जिद्द,परिश्रम व जिज्ञासू वृत्ती यशाची त्रिसूत्री आहे, असे प्रतिपादन शाळेचे १९८६ बॅचचे माजी विद्यार्थी व अभियंता प्रसाद सुरेशचंद्र तलाठी यांनी केले. चंपाबेन वाडीलाल ज्ञानमंदिर प्रशालेच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



याप्रसंगी माजी विद्यार्थी कंटेंट क्रियेटर नरहर गोसावी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून तर डॉ.सौ.अनिता तलाठी, माजी विद्यार्थिनी सौ.कोठारी,सांगली शिक्षण संस्थेचे संचालक व शालासमितीचे अध्यक्ष रविंद्र देवधर, शाळेचे मुख्याध्यापक मुकुंद जोग, पर्यवेक्षिका सौ.मिरजकर स्नेहसंमेलन कार्याध्यक्षा सौ.अर्चना माळी,एनसीसी विभाग प्रमुख श्री क्षीरसागर, विद्यार्थी व विद्यार्थिनी प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी कला रांगोळी विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन तसेच सरस्वती व संस्थापकांच्या प्रतिमांचे पूजन पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले. अहवालाचे वाचन पर्यवेक्षिका सौ.मिरजकर यांनी केले. पारितोषिक वितरण कार्यक्रमात ५वी ते ८वी विशेष गुणवत्ता पारितोषिक आणि इ.९वी व १०वी बौद्धिक व क्रीडा स्पर्धांचे पारितोषिकांचे वितरण पाहुण्यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमास कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.माधुरी कुलकर्णी यांनी केले तर श्री.फल्ले यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य प्राप्त झाले.

## पत्रकार दिनी मारुती नवलाई यांचा विशेष सन्मान

कोल्हापूर : प्रतिनिधी




वारणा कोडोली येथील रघुनाथ बुरांडे ग्रंथालय प्रांगणात पश्चिम महाराष्ट्र ऑल रजिस्टर न्यूज पेपर असोसिएशनच्या वतीने दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करत विविध क्षेत्रातील मान्यवरांचे सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला. पत्रकारांचे सन्मान माहिती विभागाचे उपसंचालक मा. प्रवीण टाके यांच्या हस्ते करण्यात आले.

ऑल रजिस्टर न्यूज पेपर असोसिएशनच्या उपक्रमांतर्गत पश्चिम महाराष्ट्र विभागीय पत्रकार दिनी पत्रकारांचा मेळावा आणि वाचकांचा संवाद हा उपक्रम यशस्वीरित्या राबवण्यात आला. यावेळी सामाजिक क्षेत्रातील विविध पुरस्कार प्राप्त करणारे, तसेच राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटक मारुती नवलाई यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

सोहळ्यात प्रा. डॉ. सागर बोराडे, मा. संदीप लोंढे (राज्य अध्यक्ष, राष्ट्रीय मानवी अधिकार सुरक्षा संघ, नई दिल्ली), कोल्हापूर जिल्हा माहिती अधिकारी सचिन अडसूळ, कोडोली सरपंच सौ. सुनिता केकरे, उपसरपंच प्रशांत जमणे, ऑल रजिस्टर न्यूजचे पश्चिम विभागीय अध्यक्ष मकरंद बुरांडे, विजयकुमार पोद्दार, दीपक ढवळे, नितीन पाटील, जे वाय पाटील, शाहीन शेख, ईश्वर हुलवान, कराडचे अबू बक्कर शेख, पंजाबराव पवार, सचिन गवळी, बाबुराव साळुंखे, बाळासाहेब वाघमोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर सोहळ्याचे प्रारंभी शहीन शेख यांनी प्रास्ताविक केले, तर दीपक ढवळे यांनी आभार मानले. यावेळी महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील विविध मान्यवरांचे मार्गदर्शन, मनोगत व संवाद घेण्यात आले. सोहळा यशस्वी करण्यासाठी ओंकार बुरांडे परिवार आणि यश ढवळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## विराज शिंदे यांचा डॉ. शंकर साळुंखे यांच्या हस्ते सत्कार

आष्टा : प्रतिनिधी

आष्टा नगरपरिषद निवडणुकीत आष्टा शहर विकास आघाडीचे उमेदवार विराज शिंदे यांनी प्रभाग क्रमांक ९ मधून बहुमताने विजय मिळवून आपले वर्चस्व सिद्ध केले. ते आमदार जयंत पाटील गटाचे निष्ठावंत कार्यकर्ते असून त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल डॉ. शंकर साळुंखे (एम.डी. ॲक्यूप्रेशर, वनौषधी पदविका, आयुर्वेदिक पंचकर्म तज्ञ) यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

विराज शिंदे हे राजारामबापू कारखान्याचे माजी संचालक तसेच माजी नगराध्यक्ष शंकर शिंदे यांचे सुपुत्र आहेत. त्यांच्या विजयामुळे प्रभाग क्रमांक ९ मध्ये विकासाभिमुख नेतृत्वाला जनतेने दिलेला ठाम पाठिंबा स्पष्ट झाला आहे.



या सत्कारप्रसंगी सौ. सारिका साळुंखे, सौ. अनिता वरणे, हर्षल शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांनी विराज शिंदे यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## मुलांवर अपेक्षांचे ओझे लादू नका : नामदेव माळी

बोरगाव : प्रतिनिधी

बोरगाव ता. वाळवा येथील हिंदमाता शिक्षण संकुलामध्ये १० जानेवारी मोहनराव पतंगराव पाटील (अण्णा) व १७ जानेवारी लोकनेते राजारामबापू पाटील यांचा स्मृतिदिन स्मृती सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे. या स्मृती सप्ताहाचा शुभारंभ दहा जानेवारी रोजी नामदेव माळी निवृत्त उपक्रमशील शिक्षणाधिकारी व साहित्यिक यांच्या हस्ते झाला.




यावेळी बोलताना ते म्हणाले,'पालकांनी विद्यार्थ्यांची इतरांशी तुलना करू नये, आपल्या मुलांना कमी लेखू नये, विशिष्ट लेबल लावू नये,विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनी गोष्टी सांगाव्यात. आपण आज केलेल्या कार्यात उद्या प्रगती होणे हीच यशाची व्याख्या आहे.

ज्ञान रचनावादाचा आधार घेऊन शाळांमध्ये फक्त पुस्तकी ज्ञान न देता निसर्गाचे निरीक्षण करणे, त्याच्या नोंदी ठेवणे,मुलांना मुक्तपणे अनुभव घेण्याचे स्वातंत्र्य द्यावे.'

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे मानद सचिव मा.माणिकराव पाटील म्हणाले, मोहनराव अण्णांनी ज्या उद्देशाने हे शैक्षणिक संकुल उभा केले तो उद्देश सफल होताना दिसतो आहे'.

यावेळी विविध शाखांच्या हस्तलिखीतांचे प्रकाशन प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते करण्यात आले.संकुलातील आदर्श विद्यार्थी, यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या सप्ताहाच्या निमित्ताने विज्ञान प्रदर्शन, जुन्या पुरातन वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले आहे. तसेच तालुकास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धा घेण्यात आली.

या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक मुख्याध्यापिका कल्पना कुंभार यांनी, अहवाल वाचन जानकी इंगवले यांनी तर आभार रुपाली भालेकर यांनी मानले. सुत्रसंचालन डॉ.कल्पना पाटील यांनी केले.

या कार्यक्रमास हिंदमाता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष शांताराम पाटील, उपाध्यक्ष संजय पाटील, सहसचिव अभिजीत पाटील , संस्थेचे सर्व संचालक,विविध संस्थांचे पदाधिकारी,पालक, ग्रामस्थ, पत्रकार बंधू, विद्यार्थी, संकुलातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सांगली जिल्हा क्रिकेट संघ उपांत्य फेरीत



सांगली : प्रतिनिधी

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनतर्फे आयोजित एमसीए अंडर१९ इन्व्हिटेशन लीग स्पर्धेत सांगली जिल्हा क्रिकेट संघाने सातत्यपूर्ण आणि प्रभावी कामगिरी करत उपांत्य फेरीत दणदणीत प्रवेश केला आहे. स्पर्धेतील साखळी सामन्यांत संघाने दाखवलेल्या उत्कृष्ट खेळामुळे सांगलीचा संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला आहे.

उपांत्य फेरीतील ही महत्त्वपूर्ण लढत येत्या सोमवारपासून 'सेक्रेटरी इलेव्हन' संघाविरुद्ध खेळविण्यात येणार आहे.

या उल्लेखनीय यशाबद्दल सांगली जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चेअरमन माननीय संजयजी बजाज, खजिनदार सी. के. पवार व किशोरभाई शहा, महाराष्ट्र राज्य टूर्नामेंट कमिटीचे सदस्य निलेश शहा, निवड समिती सदस्य चेतन पडियार, सागर कोरे व प्रशांत कोरे, संघ प्रशिक्षक सागर कोरे व कपिल गस्ते, तसेच युसूफ जमादार, सुमित चव्हाण आणि अमित फारणे यांनी संघातील सर्व खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले असून त्यांच्या शानदार कामगिरीचे भरभरून कौतुक केले आहे.

# व्यक्तिमत्व विकासामध्ये संभाषण कौशल्य महत्वाचे : डॉ. माने




## राजे रामराव महाविद्यालयात कार्यशाळा संपन्न

**जत : प्रतिनिधी**

व्यक्तिमत्व विकासामध्ये प्रभावी संभाषणाची कौशल्ये अत्यंत महत्त्वाची असून, ती वैयक्तिक आणि व्यावसायिक यशाची गुरुकिल्ली आहेत. अलीकडील चर्चा आणि तज्ञांच्या मते, स्पष्ट संवाद, आत्मविश्वासाने बोलणे आणि इतरांच्या भावना समजून घेणे हे चांगले संबंध निर्माण करण्यासाठी, संघर्ष टाळण्यासाठी आणि एकूणच जीवनात आनंदी राहण्यासाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन सांगोला येथील डॉ. गणपतराव देशमुख महाविद्यालयाचे इंग्रजी विषयाचे प्राध्यापक डॉ. मनोजकुमार माने यांनी व्यक्त केले. ते राजे रामराव महाविद्यालयाच्या इंग्रजी विभाग, लीड कॉलेज व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवशीय कार्यशाळेत प्रमुख साधन व्यक्ती म्हणून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील उपस्थित होते.

अधिक बोलताना ते म्हणाले, व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, केवळ ज्ञानापेक्षा ते ज्ञान प्रभावीपणे व्यक्त करणे जास्त महत्त्वाचे आहे. संवाद कौशल्ये ही एक अशी कला आहे, जी शिकून आणि सराव करून कोणीही आपले व्यक्तिमत्व अधिक प्रभावी बनवू शकते. हे कौशल्य विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये पुढे जाण्यास मदत करते. या कार्यशाळेचे स्वागत व प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख डॉ. रामदास बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. तुकाराम सन्नके तर आभार डॉ. लक्ष्मण भरगंडे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेस लीड कॉलेजचे समन्वयक प्रा. आशिष घोडके, प्रा. देवयानी करे यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुरोगामी विचारांची थट्टा करणाऱ्यांना मतपेटीतून चपराक

## आ.जयंतराव पाटील, खा.विशाल पाटील, आ.विश्वजीत कदम यांच्या एकत्रित सभांना प्रतिसाद

### आ.विश्वजीत कदमांचा थेट इशारा

**सांगली : प्रतिनिधी**

शाहू-फुले-आंबेडकर यांचा विचार जपण्याचा आव आणून जातीय सलोखा बिघडवणाऱ्या आणि पुरोगामी विचारांना धुळीस मिळवणाऱ्या या सत्ताधाऱ्यांना मतपेटीतून जनतेने कौल दाखवून देण्याचे आवाहन आ. विश्वजीत कदम यांनी केले. सांगलीतील प्रभाग क्रमांक १५ मधील सभेत ते बोलत होते

सांगलीमिरजकुपवाड शहर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १६, १५, १० व १९ मध्ये काँग्रेस व महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचार यात्रा व संवाद बैठका पार पडत आहेत. यावेळी उपस्थित राहून आमच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले.

तिन्ही शहरांच्या विकासाचे योग्य व्हिजन आखून या निवडणुकीला आम्ही



सामोरे जात आहोत. सर्वांगीण व समतोल विकासासाठी महाविकास आघाडीची भूमिका स्पष्ट आहे. लोकहिताला प्राधान्य देण्याचे धोरण राबवणे हे आमचे मुख्य तत्त्व आहे. महायुतीचे सरकार बेभरवशाचे राजकारण करणारे आणि केवळ अर्थकारणावर लक्ष देणारे सरकार आहे. जनतेचे यांना काहीच सोयरसुतक नाही.

शाहू-फुले-आंबेडकर यांचा विचार जपण्याचा आव आणून जातीय सलोखा बिघडवणाऱ्या आणि पुरोगामी विचारांना धुळीस मिळवणाऱ्या या सत्ताधाऱ्यांना मतपेटीतून जनतेने कौल दाखवून देण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी माजी मंत्री आ. जयंतराव पाटील, खा. विशालदादा पाटील तसेच बहुसंख्य काँग्रेस व महाविकास आघाडीचे पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# छ.शिवाजी विद्यानिकेतनमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**पेठवडगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी विद्यानिकेतन व ज्युनि. कॉलेज आणि दिशा इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटन पैलवान पृथ्वीराज पाटील, माजी विद्यार्थी संकेत कदम, डॉ. अनुप खारगे, शिक्षक नेते दादासाहेब लाड व विजयसिंह माने यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजनाने करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी क्रीडा प्रात्यक्षिके सादर केली, शिस्तबद्ध परेड केली आणि वार्षिक अंक 'छत्रपती' प्रकाशीत झाला. राष्ट्रीय, राज्यस्तरीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील यशस्वी विद्यार्थी आणि माजी विद्यार्थ्यांचा गौरव पारितोषिक देऊन करण्यात आला. ग्रंथ प्रदर्शन, कलादालन व रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले.

# मुरगूड नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी रेखाताई मांगले

- स्वीकृत नगरसेवकपदी सुनिल मंडलिक व राहूल शिंदे



**मुरगूड : प्रतिनिधी**

मुरगुड नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी मंडलिक गटाच्या श्रीमती रेखाताई आनंदा मांगले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. तर स्वीकृत नगरसेवकपदी सुनील गणपती मंडलिक व राहूल शामराव शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली. यशवंतराव चव्हाण सभागृहात झालेल्या या निवड सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा सुहासिनीदेवी पाटील या होत्या .

मुरगूड नगर परिषदेवर शिवसेना - भाजपा युतीची सत्ता आली आहे. आज सभागृहामध्ये पहिली सभा शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली . तत्पूर्वी उपनगराध्य पदासाठी नूतन नगरसेविका रेखाताई मांगले यांचा एकमेव अर्ज दाखल करण्यात आला होता त्यांच्या विरोधात कोणताही अर्ज न आल्याने निवडणूक बिनविरोध झाली पीठासीन अधिकारी तथा मुख्याधिकारी अतिश वाळुंज यांनी अधिकृतपणे रेखाताई मांगले यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा केली.

यावेळी नूतन पदाधिकाऱ्याचा नगराध्यक्षांच्या हस्ते सत्कार करणेत आला उपनगराध्यक्षपदी निवड झाल्यानंतर मंडलिक समर्थकांनी गुलालाची उधळण करत फटाक्यांची आतषबाजी करून आनंद साजरा केला. या निवडणुकीदरम्यान कार्यकर्ते नागरिक आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाली होते. यावेळी नगराध्यक्षा सुहासिनीदेवी पाटील, उपनगराध्यक्षा रेखाताई मांगले, गटनेते सुहास खराडे, माजी नगराध्यक्ष नामदेवराव मेंडके, माजी उपनगराध्यक्ष जयसिंग भोसले, यांच्यासह नगरसेवक व नगरसेविकेंची भाषणे झाली. यावेळी नगरसेवक शिवाजी चौगले, अनिल राऊत, सुनील रणवरे, रणजित भारमल, सत्यजित पाटील, दत्तात्रय मंडलिक, बजरंग सोनुले, राजू आमते, विजय राजिगरे, नगरसेविका, गीतांजली आंगज, सुरेखा लोकरे, संजीवनी कांबळे, वैशाली गोधडे,सुजाता पुजारी, निकेलीन बारदेस्कर,विजयमाला शिंदे, संध्या पाटील, संगिता चौगले यांच्यासह भाजपा शिवसेनेचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# यशाचे शिखर गाठण्यासाठी प्रामाणिक कष्ट हाच पर्याय : प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे

**तासगाव : प्रतिनिधी**

आजच्या स्पर्धेच्या युगात कोणत्याही क्षेत्रात यश संपादन करावयाचे असल्यास प्रामाणिक कष्ट हाच अंतिम पर्याय आहे असे उद्गार प्राचार्य डॉ.मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, तासगाव येथे श्वेता चव्हाण या विद्यार्थिनीच्या सत्कार समारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलताना काढले.वाणिज्य विभागाची विद्यार्थिनी कु.श्वेता चव्हाण हिने द इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्ट अकाउंटंट ऑफ इंडिया यांच्याकडून डिसेंबर २०२५ मध्ये घेतलेल्या



फाउंडेशन परीक्षा मध्ये उज्वल यश संपादन केले.म्हणून तिचा सत्कार समारंभ महाविद्यालयात आयोजित केला होता.प्राचार्य पुढे म्हणाले महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थिनींनी कु.श्वेता चव्हाण हिने राष्ट्रीय स्तरावर घेतल्या जाणाऱ्या सीएमए परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. या यशामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.राष्ट्रीय पातळीवरील कठीण समजल्या जाणाऱ्या परीक्षेत यश संपादन करून विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण केला.महाविद्यालयातील कॉमर्स विभागातील गुरुदेव कार्यकर्त्यांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षेत यश मिळवणारी ही पहिली विद्यार्थिनी असल्याचा आम्हांला अभिमान वाटतो.विद्यार्थ्यांनी अशा विविध परीक्षेत सहभागी होऊन यश संपादन करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख डॉ.अमोल सोनवले यांनी केले तर आभार डॉ.श्रृती परचुरे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.गोरख पाटील यांनी केले. कार्यक्रमाला प्रा.नेहा मोरे, प्रा.सुनिता यमगर यांसह महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी - मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेठ ग्रामपंचायतीवर पाणी प्रश्नासाठी धडक मोर्चा

## पाण्याचे गाजर दाखवून सत्ता मिळवली : ग्रामस्थांचा आरोप

**ईश्वरपूर : प्रतिनिधी**

पेठ गावातील तीव्र पाणी टंचाईच्या प्रश्नावरून ग्रामस्थांनी ग्रामपंचायतीवर धडक मोर्चा काढला. गेल्या तीन वर्षांपासून पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करणाऱ्या ग्रामस्थांनी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अकार्यक्षमतेविरोधात संताप व्यक्त केला. पाणी प्रश्नाचे आश्वासन देऊन सत्ता मिळवली; मात्र प्रत्यक्षात प्रश्न सुटलेला नाही, असा आरोप यावेळी करण्यात आला.

शुक्रवारी सकाळी बाजारपेठेतून मोर्चाला सुरुवात झाली. महिला



घागरी घेऊन सहभागी झाल्या होत्या. मोर्चा ग्रामपंचायत कार्यालयावर धडकताच सरपंच, उपसरपंच व सत्ताधारी सदस्यांना ग्रामस्थांनी जाब विचारला. पाणी प्रश्न तातडीने सोडवावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

मोर्चासमोर बोलताना भाजपचे सांगली जिल्हाध्यक्ष सम्राटबाबा महाडीक म्हणाले, "ग्रामपंचायतीची सत्ता तुमच्याकडे असताना पाणी प्रश्न तुम्हीच सोडवायला हवा. तीन वर्षे सत्तेत असूनही काहीच न करता आता सरकारवर दोष देणे म्हणजे जनतेची दिशाभूल आहे." निवडणुकांच्या तोंडावर पाण्यावर राजकारण करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी माजी उपसरपंच शंकर पाटील यांनी सहा महिन्यांत योजना पूर्ण करण्याचे आश्वासन अपूर्ण राहिल्याचे सांगितले. महिलांनी पाणी टंचाईमुळे होणाऱ्या दैनंदिन त्रासाला वाचा फोडली. मोर्चात माजी जि. प. सभापती जगन्नाथ माळी, मोहन मदने, माजी सरपंच मीनाक्षी महाडीक यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते. ग्रामस्थांच्या वतीने ग्रामपंचायतीला निवेदन देण्यात आले.

# आविष्कार कल्चरल ग्रुपचा संगीत महोत्सव परंपरेला साजेसा : देवराज पाटील

**ईश्वरपूर : प्रतिनिधी**

आविष्कार कल्चरल ग्रुपने गेल्या २३ वर्षांत दर्जेदार कार्यक्रमांची परंपरा जपत राज्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात स्वतःची ठळक ओळख निर्माण केली असून भविष्यात या संस्थेला अधिक पाठबळ देण्याची गरज आहे, अशी भावना माजी जिल्हा परिषद अध्यक्ष देवराज पाटील यांनी व्यक्त केली. आविष्कारचा २४ वा संगीत महोत्सवही या समृद्ध परंपरेला साजेसा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राजारामनगर येथे आयोजित आविष्कार कल्चरल ग्रुपच्या सभासद नोंदणी शुभारंभप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राजारामबापू मिलिटरी स्कूलचे विनायक पाटील, साईसम्राट उद्योग समूहाचे धैर्यशील पाटील, सेवानिवृत्त उपअभियंता रामचंद्र चव्हाण, मजूर फेडरेशनचे संचालक संतोष पाटील, सचिव



धनाजी जगताप आदी उपस्थित होते. याप्रसंगी अष्टविनायक शेतीमाल प्रक्रिया व विक्री संस्थेचे अध्यक्ष विनायक यादव यांचा सत्कार करण्यात आला.

विनायक पाटील यांनी आविष्कारने वाळवा तालुक्याचा सांस्कृतिक वारसा जपत कौटुंबिक कला दालन उभे केल्याचे सांगितले. धैर्यशील पाटील यांनी मनोरंजन, आरोग्य व नातेसंबंध जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमात अनेक नव्या सभासदांचे फॉर्म स्वीकारण्यात आले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक हर्षवर्धन मोहिते यांनी केले. सूत्रसंचालन सौरभ सावंत यांनी तर आभार सुरज कचरे यांनी मानले. कार्यक्रमास आविष्कारचे पदाधिकारी, सदस्य व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकारांनी समाजभान ठेवून पत्रकारितेचा उपयोग समाजासाठी करावा : शिवाजी करे

**मुरगूड : प्रतिनिधी**

सामाजिक दृष्टीकोनातून केलेल्या पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाचे अनेक प्रश्न सुटतात.ते एक समाज विकासाचे माध्यम आहे.पत्रकारितेचा उपयोग पत्रकारांनी समाजभान ठेवून समाजासाठी करावा असे आवाहन मुरगूडचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी करे यांनी केले.

येथील नगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात पत्रकार दिन साजरा करण्यात आला याप्रसंगी श्री करे बोलत होते अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक माजी प्राचार्य पी.डी मगदूम होते.सुरुवातीला दुय्यम निबंधक सौ प्रतिभा पवार यांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

पत्रकार प्रकाश तिराळे यांनी स्वागत



केले. पत्रकार अनिल पाटील यांनी प्रास्ताविकातून पत्रकारिते समोरील नवनवीन आव्हानांचा ऊहापोह केला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार भैरवनाथ डवरी, कॉ.बबन बारदेस्कर,माजी प्राचार्य पी.डी. मगदूम यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी कोल्हापूर डिस्ट्रीक्ट रिपोर्टर्स वेल्फेअर असोसिएशनतर्फे देण्यात येणारा कागल तालुका आदर्श पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल पत्रकार दिलीप निकम यांचा सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवाजी करे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास निवृत गटशिक्षणाधिकारी पी.आर पाटील, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी एम.टी. सामंत ज्येष्ट नागरिक संघाचे समन्वयक जयवंत हावळ,सामाजिक कार्यकर्ते प्रदीप वर्णे,दिगंबर परीट आदी प्रमुख उपस्थित होते.पत्रकार समीर कटके यांनी सूत्रसंचालन केले.तर संदीप सुर्यवंशी यांनी आभार मानले.

## महादेव पाटील यांचे निधन

**कोतोली : प्रतिनिधी**



पन्हाळा तालुक्यातील वाघवे येथील जेष्ठ नागरिक महादेव लखू पाटील (वय १०३) यांचे निधन झाले. ते जि. प. आरोग्य कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष एम.एम.पाटील यांचे वडील होत.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, मुलगी, नातवंडे असा परिवार आहे.

## यशोदा पाटील यांचे निधन

**येळावी : प्रतिनिधी**



येथील श्रीमती यशोदा कृष्णराव पाटील (वय-९६) यांचे निधन झाले.कै.बी. के. पाटील व श्री. आबासो कृष्णराव पाटील यांच्या मातोश्री श्री.रोहित व योगेश पाटील यांच्या आजी होत.त्यांच्या पश्चात मुलगा,सून,नातवंडे असा परिवार आहे.

► RNI NO. MAH/MAR/2013/52902 ► Posting at : Sangli H.O. ► Postal Regd. No. : SGL/102/2025-2027 ► Date of Publication : 16/01/2026 Every Friday